ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175

वर्ष ३७ पुणे, बुधवार, १९ मे, १९७१ अंक १०

## अर्थ-सहाय्यामुळे तुमच्या शेतीत काय फरक पडतो ते 'सेंट्रल' ला विचारा



PNB/CBI-120-71 MAR.

यासाठीं 'सेंट्रल' मध्यें आमच्याशीं संपर्क साधा. आमची प्रत्येक शाखा सामान्य माणसाला सुध्दां सेवा उपलब्ध करुन देते. 'सेंट्रल' च्या सुलभ आर्थिक सहाय्यामुळें शेतीमध्यें कसा कायापालट होतो हे आम्हाला अनुभवाने माहिती आहे. शेतीसाठीं जलसिंचन, विद्युतीकरण, यांत्रिकीकरण, सुधारलेली बियाणीं व आधुनिक खते आणि अशाच कित्येक बाबींनी ग्रामीण भागाचे स्वरूप पालटत आहे. त्याला गतिमान करण्याची 'सेंट्रल' ने खूणगाठ बांधली आहे.

आपण 'सेंट्रल' ला भेट द्या आणि आपल्यासाठीं खास वाट पहात असलेल्या अर्थ-सहाय्य-योजना पाहून आपण चकित व्हाल.
आजकाल 'सेंट्रल' जणू शेतकऱ्यांचीच बँक झाली आहे.

## सेंट्रल बँक ऑफ इंडिया

मुख्य कचेरी : महात्मा गांधी मार्ग, मुंबई-१ □ वी. एन् आडारकर – कस्टोडियन
जागोजागीं जनतेकडे जाणारी बँक

## स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स लि. च्या व्यवहारात वाढ

स्वस्तिकने १९७० मध्ये ६·४ कोटी रु. ची ( पैकी ७६·९२ लक्ष रु. ची निर्गत ) विक्री केली. १९६९ मध्ये ५·१५ कोटी रु. ची विक्री होती. ४३·६३ लक्ष रु. चा घसारा काढून कंपनीला कर-पूर्व २२·१८ लक्ष रु. नफा झाला. गेल्या वर्षाप्रमाणेच १२% इक्विटी डिव्हिडंड दिले जाणार आहे. कंपनीचा चिंचवड येथील पादत्राणांचा विभाग प्राथमिक अडचणींतून बाहेर पडून अपेक्षेप्रमाणे उत्पादन करू लागला आहे. नाशिक विभागात दुरंगी पीव्हीसी गम बुटांची निर्मिती चालू आहे, तिला लवकरच गती प्राप्त होऊन ह्या मालाची निर्गत वाढेल. स्वस्तिकमध्ये दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. चे विलिनीकरण झाल्यामुळे स्वस्तिकला सुमारे १·७५ कोटी रु. चे नवे भांडवल मिळून कंपनीच्या वाढीच्या योजना लवकर फलद्रूप होतील अशी अपेक्षा आहे. कंपनीची स्वतःची किरकोळ विक्रीची केंद्रे आणखी वाढविता येऊन गिऱ्हाइकांशी प्रत्यक्ष संपर्क साधता येईल. दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. च्या स्वस्तिकमध्ये विलिनीकरणामुळे स्वस्तिकच्या शेअर भांडवलात मोठी भर पडणार आहे. तरीसुद्धा १००रु. च्या शेअरचा बाजारभाव १४१ ते १४३ रु. च्या मध्ये टिकून आहे.

## फळबागांच्या विकासासाठी मध्यवर्ती संघटना

फळबागांचा विकास आणि त्यासंबंधी संशोधन करण्यासाठी एखादी मध्यवर्ती संघटना स्थापन करण्याचा विचार भारत सरकार करीत आहे. फळांची निर्यात वाढविता येणे कितपत शक्य आहे त्याचाही विचार करण्यात येत आहे. इस्राइल ह्या देशाने फळांची निर्यात करण्यासाठी जशी संघटना उभी केली आहे, त्याच धर्तीवर संकल्पित भारतीय संघटना स्थापन करण्यात यावयाची आहे. केळी, आंबे व इतर फळे ह्यांच्यासाठी एक मंडळ उभारण्यात येईल. इंडिअन इन्स्टिट्यूट ऑफ फॉरिन ट्रेड आणि आंब्यांच्या धंद्याचे काही प्रतिनिधी अलीकडेच परदेशचा दौरा करून आले. त्यांना असे आढळून आले की ताजी फळे आणि भाजीपाला ह्यांची परदेशात निर्यात करण्यास बराच वाव आहे सध्या भारतामधून सुमारे १ लाख, १० हजार टन फळे व भाजीपाला परदेशात पाठविला जातो. देशातील एकूण उत्पादनाच्या मानाने ही निर्यात फारच अल्प आहे. ह्या मालाची वार्षिक जागतिक निर्यात ७०० कोटी डॉलर्स किंमतीची आहे आणि त्यात भारताचा वाटा अवघा ९० लाख डॉलर्सचा आहे. अलीकडे इस्राइल, फोर्मोसा, मलेशिआ, फिलिपाइन्स, केनिआ, मोरोक्को इत्यादी देशांनी फळांच्या निर्यातीला महत्त्व देऊन त्यांचे उत्पादन खूपच वाढविले आहे. ह्या प्रकारच्या मालाचे उत्पादन करून त्यांची निर्यात करण्याचे काम अवघड आहे. कारण फळबागायती माल हा नाशवंत स्वरूपाचा असतो. त्याची साठवण व जपणूक करून तो चांगल्या पॅकिंगमध्ये भरणे आवश्यक असते. असा हा व्याप कोणी खाजगी उद्योगपती करण्यास तयार होण्याचा फारसा संभव नाही.


सरदारगृह


मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.

मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

फोन नं. :- ३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार—सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.



विवाह गाठी बरोबरच आणखी एक खुणगाठ बांधा
बचत ही आतां आपली गरजेची बाब आहे.
बँकेच्या विविध ठेव योजनांचा फायदा घ्यावयाचा आहे
ही खुणगाठ आजच नविन ठेव खाते उघडून निश्चित करा
मुख्य कचेरी राजपथ सातारा किंवा कोणत्याही शाखेत भेटा अगर लिहा
दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.
स्थापना - १९३६, महाराष्ट्रांत सर्वत्र शाखा शेड्यूल्ड बँक.

☆ अर्थ ☆

बुधवार, १९ मे, १९७१





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

## परदेशीय गुंतवणूक सुधारण्याची शक्यता

इंटरनॅशनल चेंबर ऑफ कॉमर्स ह्या संघटनेचे माजी अध्यक्ष डॉ. भरत राम ह्यांनी भारतात परदेशीय भांडवलाची गुंतवणूक होण्याबद्दल आशावादी उद्गार काढले आहेत. ते नुकतेच परदेशांचा दौरा करून आले आहेत. पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले की भारतात नुकत्याच झालेल्या सार्वत्रिक निवडणुकी-नंतर स्थिर सरकार अस्तित्वात आले आहे. त्यामुळे परदेशीय भांडवलाची गुंतवणूक होण्यास अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे, असे आंतरराष्ट्रीय उद्योगपती व व्यापारी ह्यांचे मत झाले आहे. अलीकडे जपानी धंदेवाइकांनी भारताला भेट दिली होती. त्यांनी भारतामधील भांडवल गुंतवणुकीसंबंधी व्यक्त केलेला अभिप्राय एकंदरीने सर्वच उद्योगपतींच्या मताचा निदर्शक समजण्यास हरकत नाही. फक्त दोनच वर्षांपूर्वी जपानी आर्थिक मंडळाच्या प्रतिनिधीने भांडवल गुंतवणुकीविषयी अगदी विरुद्ध मत व्यक्त केले होते. गेल्या काही वर्षांत परदेशीय भांडवल काहीसे बुजलेले होते. भांडवल गुंतविण्यास समर्थ असलेल्या देशांत संशयाचे व जोखमीचे वातावरण निर्माण झाले होते. आता ह्या भावना नाहीशा झाल्या आहेत. खाजगी मालकीच्या भांडवलाला विधायक कामगिरी करता येईल आणि तशी ती करू देण्यास संधी दिली जाईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. भांडवलाचा व तंत्रज्ञानाचा प्रसार जगभर करण्याचे कार्य त्याला करावयाचे आहे. ते नीटपणे पार पाडण्यात आले तर जगातील साधनसंपत्ती उत्पादकतेसाठी वापरता येईल, लोकांना रोजगार मिळेल आणि देशांतर्गत व देशादेशांतील आर्थिक विषमता कमी होण्यास मदत होईल असे मत त्यांनी व्यक्त केले.

## शेतीच्या व्यवसायातील नफ्याची प्रेरणा

शेतीच्या व्यवसायाकडे एक धंदा म्हणून पाहण्याचा दृष्टिकोन भारतात आता रुजला आहे. शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी जमीनधारणेच्या पद्धतीत सुधारणा आवश्यक मानली गेली असली तरी शेतीच्या धंद्यात नफ्याची प्रेरणा असावी की नसावी ह्याविषयी अजूनही वाद उत्पन्न होतो. ह्या वादाचा उगम रशिआ व पूर्व युरोपातील कम्युनिस्ट देशांतील शेतीपासून होतो. परंतु आता तेथेही शेतकऱ्याला नफ्याची प्रेरणा दिल्याशिवाय उत्पादन वाढण्याचा संभव नाही ह्या वस्तुस्थितीची दखल घेणे भाग पडले आहे. रशिआच्या कक्षेतील सर्व देशांपेक्षा पोलंडने ह्या बाबतीत आघाडी मारली आहे. गेल्या वर्षी ऐन नाताळात पोलंडच्या सरकारने धान्याच्या व इतर खाद्यपदार्थांच्या किंमती वाढविल्या. त्यामुळे फार मोठ्या दंगली माजून सरकार बदलले. पोलंडने आपली मागासलेली शेती प्रगत करण्यासाठी आता नवे धोरण स्वीकारलेले आहे. पोलंडचे सरकार आता शेतकऱ्यांना जमीन घेण्यास नुसती परवानगीच देत नाही; तर ती खरेदी करण्यास उत्तेजनही देत आहे. खुद्द रशिआतही सामुदायिक शेती मोडण्यास अल्प प्रमाणात आरंभ झालेला आहे. बरीच मोठी सामुदायिक शेती विभागण्यात येऊन त्याजागी ५०० हेक्टरचे एक शेत बनविण्यात येत आहे. ही नवीन शेती पाच अगर सहा कुटुंबांना कसण्यासाठी देण्यात येत आहेत. शेताबरोबरच त्यांना अवजारेही वापरण्यासाठी देण्यात येतात. ह्या पद्धतीमुळे काही ठिकाणी एका वर्षाच्या अवधीत उत्पादनात १०० टक्के वाढ झाल्याचे दिसून आले आहे. उत्पादनात आणखीही वाढ करता येण्यासारखी परिस्थिती उत्पन्न झाली आहे.

## इंजिनिअरिंग सर्व्हिस परीक्षेची विद्यार्थ्यांना माहिती नाही

मध्यवर्ती सरकारच्या पब्लिक सर्व्हिस कमिशनने आय्. ए. एस्. परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांसंबंधी एक पाहणी केली होती. अशाच प्रकारची पाहणी कमिशनने इंजिनिअरिंग सर्व्हिस परीक्षे-बाबत अलीकडे केली आहे. पाहणीसाठी १९६८ साल निवडण्यात आले होते. ह्या पाहणीच्या निमित्ताने काही मनोरंजक माहिती उपलब्ध झालेली आहे. इंजिनिअरिंगच्या परीक्षेसाठी एकूण २,१२१ विद्यार्थी बसले. त्यांपैकी १,१५० अथवा ५४·२२ टक्के विद्यार्थी पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाले. परीक्षेचा निकाल जाहीर करणाऱ्या सरकारी पत्रकात ३५४ विद्यार्थ्यांच्या नावाचा समावेश करण्यात आला. त्यांत २८६ जण पहिल्या वर्गात उत्तीर्ण झालेले होते. परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची विद्यापीठागणिक चिकित्सा करण्यात आली असता असे दिसून आले की ह्या परीक्षेची लोकप्रियता निरनिराळ्या विद्यापीठांत अगर तांत्रिक शिक्षण संस्थांतून वेगवेगळ्या स्तरावर आहे. बऱ्याच विद्यापीठाच्या अगर तांत्रिक शिक्षणसंस्थांच्या विद्यार्थ्यांना ह्या परीक्षेची माहितीच नव्हती, किंवा परीक्षेला बसून त्यात पुढे येण्याची इच्छाच त्यांना नव्हती. आय्. ए. एस्. परीक्षेबाबत केलेल्या पाहणीतही ही परिस्थिती आढळून आली होती. काही विद्यापीठांतून परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांच्या संख्या अशा आहेत. दिब्रुगड व सागर विद्यापीठ प्रत्येकी १; मुंबई व मराठवाडा विद्यापीठ प्रत्येकी ८ आणि खरगपूर येथील इंडिअन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ह्या संस्थेमधून ५० पेक्षा अधिक विद्यार्थी परीक्षेला बसले होते.

## प्रा. धनंजयराव गाडगीळ

### विशाल दृष्टीचा, निर्भीड, कृतिशील थोर अर्थशास्त्रज्ञ

प्रा. धनंजयराव गाडगीळ ह्यांच्या मृत्यूमुळे एका अत्यंत प्रभावी परंपरेचाही अंत झाला आहे. राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीने जे श्रेयस्कर असेल, ते स्पष्ट सांगणारांची परंपरा न्या. महादेव गोविंद रानडे ह्यांच्यापासून सुरू झाली. ना. गोपाळ कृष्ण गोखले, प्रा. वामन गोविंद काळे आणि प्रा. धनंजयराव गाडगीळ ह्यांनी रानड्यांच्या ध्येयनिष्ठेचे तंतोतंत पालन करून महाराष्ट्राला आणि भारताला अचूक मार्गदर्शन केले. अर्थशास्त्रज्ञ म्हणजे अर्थशास्त्र जाणणारा पुस्तकी विद्वान, कॉलेजात विद्यार्थ्यांना शिकविणारा प्राध्यापक, ही संकुचित व्याख्या प्रा. काळे आणि प्रा. गाडगीळ ह्यांनी बदलून टाकली. नव्या उपक्रमांना मार्गदर्शन करणे, त्यासाठी जरूर तर अप्रियता पत्करणे, स्वतःचे पैसे त्यात गुंतविणे, लायक लोकांना प्रभावित करून त्यांच्यात प्रेरणा निर्माण करणे, थोडक्यात म्हणजे जे आपण शिकवितो ते प्रत्यक्षात उतरविण्यासाठी सतत प्रयत्न करणे, असा कृतिशील अर्थशास्त्रज्ञ ह्यापुढे निर्माण होणे कठीण आहे.



प्रा. गाडगीळ ह्यांनी काही संस्थांपुरतेच कार्य मर्यादित न करता सबंध आर्थिक, शेतीविषयक, औद्योगिक जीवनाचा कायापालट करण्यात आपले आयुष्य वेचले. ग्रामीण भागाच्या विकासावर भर देण्याचे महत्त्व राजकीय पुढाऱ्यांच्या कितीतरी आधी त्यांनी प्रतिपादन करून त्याबाबत प्रत्यक्ष कार्य केले. सहकारी साखर कारखान्यांचे ते जनकच होत; त्यांच्या मार्गदर्शनामुळेच आज सहकारी तत्त्वांवर चालणाऱ्या साखर कारखान्यांचे जाळेच्या जाळे सर्वत्र पसरले आहे. कोणत्याही प्रश्नाचे काटेकोट आणि निःस्पृह निरीक्षण करून प्रत्यक्ष कृतीत सहभागी होणे आणि त्याबाबत जबाबदाऱ्या पत्करून त्या निरलसपणे पार पाडणे, हे असामान्यत्व त्यांच्यामध्ये होते.

महाराष्ट्राच्या आणि भारताच्या विकासाला केवळ आर्थिक अभ्युदय पुरा पडणार नाही हे जाणून त्यांनी श्री. भाऊराव पाटील ह्यांच्या रयत शिक्षण संस्थेच्या कार्यास बहुमोल हातभार लावला. बहुजन समाजाच्या हिताकडे वरच्या भूमिकेतून न पाहता बहुजन समाजातूनच नेतृत्व उदयास आणण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

त्या प्रयत्नांना हितसंबंधींचा विरोधही झाला पण त्यांनी दूरदृष्टीने आणि स्वतःच्या व्यक्तिमत्वाने इष्ट तो फरक जुन्या संस्थांतूनही घडवून आणला. प्रा. गाडगीळ ह्यांनी कोणत्याही 'वादा'ची पताका घेतली नाही; प्रगतीच्या मार्गाने जाण्यासाठी प्रत्येक 'वादी'ला विवेकाने व तारतम्याने त्यांनी पाठिंबा दिला. त्यामुळे ते सर्व पक्ष आणि पंथ ह्यांच्या आदराचे स्थान बनले. वयाच्या ७०व्या वर्षीही स्वतःची प्रेरणा आणि उत्साह कायम ठेवून, परिस्थितीची दखल घेऊन पुढची पावले टाकण्याचे अवधान राखणारे प्रा धनंजयराव गाडगीळ आपल्यातून अचानक गेले, ह्यामुळे त्यांच्या कणखर, निःस्वार्थी आणि तज्ज्ञ मार्गदर्शनाला सर्वच क्षेत्रांतील लोक मुकले आहेत. राज्यकर्त्यांशी किंवा बहुसंख्यावाल्यांशी न पटल्यामुळे राजीनामा देऊन घरी बसणाऱ्या तज्ज्ञांपेक्षा, प्रभावीपणे आपले म्हणणे इतरांच्या गळी उतरवून त्यांना कामास लावण्याची जिद्द आणि राष्ट्रप्रेम त्यांच्यामध्ये होते. त्यालाही मर्यादा पडणे अपरिहार्य असते आणि त्यामुळे त्यांना रणांगणावर लढता लढता वीरोचित मृत्यू आला, असेच त्यांच्यासंबंधी म्हणणे योग्य होईल.

साताराचे रावबहादूर रा. रा. काळे ह्यांनी मोठी देणगी देऊन गोखले इन्स्टिट्यूटच्या स्थापनेचे महत्त्वाचे कार्य केले आणि स्वतःचे जावई प्रा. गाडगीळ ह्यांना त्या संस्थेचे धुरीणत्व दिले. प्रा. गाडगीळ ह्यांनी ही संस्था स्वतःच्या कर्तृत्वाने आणि आंतरराष्ट्रीय कीर्तीने वाढविली, नावारूपाला आणली आणि तिला जगातील एक मान्यवर संस्था बनविली. ह्या इन्स्टिट्यूटमधूनच प्रा. गाडगीळ ह्यांच्या कार्याचा व्याप वाढत गेला. इन्स्टिट्यूटचे कार्य पुस्तकी स्वरूपाचे न होता ते प्रत्यक्ष परिस्थितीवर आधारलेले पाहिजे असा त्यांचा पहिल्यापासून आग्रह होता. रावबहादूर काळे ह्यांची दूरदृष्टी आणि प्रा. गाडगिळांच्या कर्तृत्वावरील विश्वास ह्यांचे चीज झाले आहे. प्रा. गाडगीळ ह्यांच्या पत्नी श्री. प्रमिलाबाई ह्यांचे समाजसेवेचे कार्य अत्यंत सातत्याचे आणि अतिशय मोठे आहे. पण अखेरपर्यंत त्यांनी प्रा. गाडगिळांची सहधर्मचारिणी म्हणूनच वावरण्यात भूषण मानले आणि आपल्या पतीला उत्कृष्ट साथ दिली. त्यांच्या हानीत आणि दुःखात प्रत्येक सुजाण कृतज्ञतापूर्वक सहभागी आहे.

---

### जनरल इन्शुअरन्सचे राष्ट्रीयीकरण

जनरल इन्शुअरन्स धंद्याचे भारत सरकारने राष्ट्रीयीकरण करण्याचे ठरवून त्याची व्यवस्था स्वतःकडे घेतली आहे. ह्या कंपन्यांत ६४ भारतीय आणि ४२ विदेशी कंपन्यांचा समावेश आहे. त्या सर्वांची एकूण जिंदगी २४० कोटी रु. आहे. सरकारतर्फे त्यांची व्यवस्था पाहण्यासाठी कस्टोडिअन्स नेमले जातील. पुढे कायदा करून कंपन्यांची मालकीही सरकार स्वतःकडे घेईल. नुकसानभरपाई केली जाईल. ४२ विदेशी कंपन्यांपैकी बहुतेक सर्व ब्रिटिश मालकीच्या आहेत.

## विविध माहिती

**रुडॉल्फ हेसचा ३० वर्षांचा तुरुंगवास** — हिटलरचा उजवा हात रुडॉल्फ हेस ह्याच्या तुरुंगवासास १० मे रोजी ३० वर्षे पूर्ण झाली. तुरुंगाबाहेर पडण्याचा त्याचा एकच मार्ग म्हणजे शवपेटी हा आहे! स्पॅनडे तुरुंगात गेली पाच वर्षे तो एकमेव कैदी आहे. त्यावर दरसाल सुमारे १०,८०,००० रु. खर्च होतो.

**अमेरिकेची भारताला मदत**—अमेरिकेने भारताला दिलेल्या मदतीची रक्कम आता ७,४२२ कोटी रुपयांवर गेली आहे.

**बांगला देशाला चित्रपट व्यवसायाचे साहाय्य**—पश्चिम महाराष्ट्रातील चित्रपट व्यवसायाने चित्रपट गृहांचे २६ मे रोजींचे सुमारे १० लक्ष रुपयांचे उत्पन्न बांगला देशाच्या मदतीसाठी देण्याचे योजिले आहे. त्या दिवशींच्या खेळांवर करमणूक कर माफ करावा, अशी विनंती महाराष्ट्र, गुजरात आणि म्हैसूर राज्य सरकारांना करण्यात येत आहे.

**विमा एजंटाचा विक्रम**—१९७०-७१ मध्ये सर्वांत जास्त आयुर्विम्याचे काम मुंबईचे दुष्यंत चंदुलाल शहा ह्यांनी केले. त्यांनी २·०८ कोटी रुपयांचे काम पुरे केले. ह्या आधीचा उच्चांक (१९६९-७० : १·४२ कोटी रु.) त्यांच्याच वाट्यास आला होता. त्यांनी १९५६ मध्ये एजंटाच्या कामास प्रारंभ केला. आतापर्यंत त्यांनी १,८०० लोकांचे विमे उतरवून दिले आहेत.

**मीटर गेजचे ब्रॉड गेजमध्ये रूपांतर** — भारतातील सर्व मीटर गेज रेल्वेलाइनींचे ब्रॉड गेजमध्ये रूपांतर करण्यास २,००० कोटी रु. खर्च येईल. ४ थ्या पंचवार्षिक योजनेत अशा रूपांतरासाठी फक्त चार कोटी रुपयांची तरतूद आहे.!

**हिप्पी फॅशनला कारखानदारांची साद**—हिप्पी फॅशनचे म्हणजे विटके आणि जुनेपुराणे दिसणारे कपडे मुद्दाम बनविण्यास अमेरिकन कपडे कारखानदारांनी प्रारंभ केला आहे. नवे कपडे जुने दिसणारे करण्यास येणाऱ्या जादा खर्चामुळे ह्या कपड्यांची किंमतही ज्यास्त ठेवली जाते.

**परीक्षेत नापास होणाऱ्यास विमा संरक्षण**— न्यू साउथ-वेल्स विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी ९० रु. चा हप्ता दिला, तर तो नापास झाल्यामुळे कॉलेज फी पुनः द्यावी लागेल त्यासाठी ३,४२० रु. मिळतील. अपघात किंवा आजारपण ह्यामुळेच परीक्षेत अपयश आलेले असले पाहिजे. मनाच्या अस्वास्थ्याची कारणेही विचारात घेतली जातील.

**पाच दिवसांचा आठवडा**—सिलोन सरकारच्या कचेऱ्या १० मे पासून आठवड्यातून पाच दिवस काम करू लागल्या आहेत. शनिवारी आणि रविवारी कचेऱ्या बंद असतात. पाच दिवसांत एकूण ३५½ कामाचे तास आहेत. म्हणजे, दररोज ७½ तास काम करावे लागते. मधे अर्धा तास सुटी असते.

**द. व्हिएटनाममधील अमेरिकन सैनिक**—दक्षिण व्हिएटनाममध्ये सध्या २,६७,१०० अमेरिकन सैनिक आहेत. डिसेंबर अखेर त्यांची संख्या १,८४,००० वर उतरविण्यात येणार आहे.

**बांगला देशाचे रेडिओ केंद्र** — स्वाधीन बांगला बेतर केंद्राचे कार्यक्रम एक किलोवॅट ट्रॅन्समिटरने प्रक्षेपित केले जात आहेत. प. पाकिस्तानच्या सैन्याने चितगावचे नभोवाणी केंद्र नष्ट करण्याचे आधीच बांगला स्वातंत्र्यसैनिकांनी तेथील ट्रॅन्समिटर काढून घेऊन हलविला, तोच आता वापरण्यात येत आहे.

**आरोपींत आणि कैद्यांत मुलांची संख्यावाढ**—भारतात वेगवेगळ्या कारणांसाठी तुरुंगवासाची शिक्षा भोगणाऱ्या प्रत्येक पाचांत एकजण २१ वर्षांपेक्षा कमी वयाचा असतो. एकूण १३,५०,००० कैद्यांपैकी २,७०,००० कैदी २१ वर्षांखालील आहेत. कैदखान्यांसाठी दरसाल २५ कोटी रु. खर्च होतात. कैद्यांच्या कारावासामुळे त्यांच्या कुटुंबीयांचा मिळवता माणूस नाहीसा होतो; त्याने होणारे नुकसान वेगळेच.

**बांगला देशात टागोर जयंतीला सुटी**—बांगला देश सरकारने रवींद्रनाथ टागोर जयंती राष्ट्रीय सुटीचा दिवस जाहीर केला आहे. महंमदअली जिनांचा जन्मदिवस आणि मृत्युदिवस राष्ट्रीय सुटीचा दिवस म्हणून मानला जाणार नाही.

**विमान प्रवास महागणार**—इंडिअन एअर लाइन्सच्या १९७०-७१ च्या अंदाज पत्रकात ३·४२ कोटी रु. चा निव्वळ नफा अपेक्षित होता; त्याऐवजी ४·६५ कोटी रुपये नुकसान येईल, असा अंदाज आहे. एअर लाइन्सने सरकारकडे २५%भाडे-वाढीची मागणी केली आहे; निदान १० ते १५% भाडे नक्कीच वाढेल.

**भातशेतीतही हरित क्रांती**—पंजाब सरकारने भातशेतीतही हरित क्रांती घडवून आणण्याची योजना आखली आहे. पंजाबात गेल्या वर्षी ५५ कोटी रुपये किमतीचा तांदूळ निर्माण करण्यात आला. भातनिर्मितीच्या नव्या योजनेत चालू वर्षी ८१ कोटी रुपयांचा तांदूळ निर्माण करण्यात येणार आहे. गेल्या वर्षी पंजाबने मध्यवर्ती तांदूळसाठ्याला ४ लाख टन तांदूळ दिला होता. ह्या वर्षी पंजाब ७ लाख टन तांदूळ देणार आहे.

**किरणोत्सर्जाने कॅन्सरचे वाढते बळी**—अणुशक्तीच्या साह्याने वीज निर्माण करणाऱ्या जगातील केंद्रांतून घातक स्वरूपाचे किरणोत्सर्जन होत असते. त्यामुळे जगातील कॅन्सरच्या रोगाने बळी पडणारांची संख्या वाढत जाईल असा इशारा एका अणुविज्ञान शास्त्रज्ञाने दिला आहे. त्याच्या हिशेबाप्रमाणे घातक किरणोत्सर्जाने नेहमीपेक्षा १ लाख अधिक लोक कॅन्सरने दगावण्याचा धोका आहे.

**मुंबईचे टेलिव्हिजन केंद्र**—मुंबई आणि श्रीनगर येथील टेलिव्हिजन केंद्रे १९७२ च्या मध्याचे सुमारास सुरू होतील. मुंबई केंद्र पुण्याशी जोडले जाऊन तेथेही टी. व्ही. चे कार्यक्रम पाहण्यास मिळू लागतील.

## शेती विद्यापीठांना जागतिक बँकेची मदत

भारतामधील ४ शेती विद्यापीठांना मदत देण्याचे जागतिक बँकेने मान्य केले आहे. ह्या सर्व विद्यापीठांना मिळून सुमारे ३० कोटी रुपयांची मदत देण्यात येईल. आसाम, बिहार, गुजरात व महाराष्ट्र ह्या चार राज्यांतील विद्यापीठांना मदतीचा फायदा मिळणार आहे. गेल्या ऑक्टोबर महिन्यात बँकेच्या एका तज्ज्ञ समितीने विद्यापीठांना भेटी दिल्या होत्या व नंतर मदतीसंबंधी भारत सरकारशी वाटाघाटी केल्या होत्या. लवकरच आणखी एक प्रतिनिधी मंडळ देशात येणार असून त्या वेळी संकल्पित मदतीच्या तपशिलासबंधी विचार करण्यात यावयाचा आहे. दरम्यान हिंदी शेती विद्यापीठांच्या मध्यवर्ती संघटनेने मध्यवर्ती सरकारला अशी सूचना केली आहे की विद्यापीठांना साह्य करण्यासाठी एका निधीची स्थापना करण्यात यावी. विद्यापीठांनी आखलेल्या ज्या विकास कार्यक्रमांना नेहमीच्या मार्गाने द्रव्यसाह्य मिळत नाही आणि म्हणून जे कार्यक्रम खुरटतात त्यांना ह्या निधीतून मदत देण्यात यावी असे सुचविण्यात आले आहे. सरकारचे अन्न व शेती खाते अशा प्रकारचा एक निधी उभारण्याचा विचार करीत आहे. निधीला लागणारा पैसा पी. एल. ४८० प्रमाणे मिळणाऱ्या अमेरिकेच्या मदतीतून उपलब्ध करून देण्यात यावयाचा आहे. अशा प्रकारच्या निधीची एक रूपरेखाही तयार करण्यात आली आहे. विद्यापीठांनी परस्परांशी सहकार्य करून संशोधनाच्या योजना हाती घ्याव्या आणि त्यासाठी राज्य सरकारांनी व शेती संशोधक मंडळाने ३ ते ५ वर्षांपर्यंत देणग्या द्याव्या असेही सुचविण्यात आले आहे. ह्या देणग्या एकमुठीने द्याव्या असा त्यांचा आग्रह आहे.

---

## भाक्रा धरणातील अपुऱ्या पाण्याचा परिणाम

भाक्रा धरणातील पाण्याच्या साह्याने वीज निर्माण करण्यात गंभीर स्वरूपाचा अडथळा उत्पन्न झाला आहे. त्यामुळे येत्या दोन महिन्यात उद्योगधंद्यांना व शेतीला पुरविण्यात येणाऱ्या विजेत बरीच मोठी कपात करावी लागण्याचा संभव आहे. कदाचित वीजनिर्मिती पूर्णपणे बंद होण्याचीही शक्यता आहे. धरणातील पाण्याचा साठा वाढण्याची चिन्हे अद्याप तरी दिसत नाहीत. उलट दररोज १ फूट ह्या वेगाने तो कमीच होत चालला आहे. ही परिस्थिती भयावह आहे. कारण धरणातील पाण्याची सध्याची पातळी किमान पातळीच्या अवघी १३ फूटच वर आहे. पातळी आणखी कमी झाली तर भाक्रा येथील वीजनिर्मितीचे केंद्रच बंद करावे लागेल. गोविंदसागर धरणाच्या पाणलोटाच्या क्षेत्रातून जितके पाणी गोळा व्हावयास पाहिजे तितके होत नसल्याने ही परिस्थिती उत्पन्न झाली आहे. गेल्या हिवाळ्यात भलत्याच वेळी अतिशय कडक थंडी पडली. त्यामुळे बर्फाचे पाण्यात रूपांतर होण्याची क्रिया फार मंदगतीने होत आहे. अर्थातच धरणात पाणी जमा होण्याच्या नेहमीच्या गतीवर विपरीत परिणाम झाला आहे. भाक्रा धरणावर तयार होणाऱ्या विजेत घट झाल्यामुळे सर्वांत अधिक परिणाम नांगल येथील रासायनिक खताच्या कारखान्यावर होणार आहे. गेल्या वर्षीही धरणावरील विजेच्या निर्मितीत पाण्याअभावी कपात करावी लागली होती आणि नांगल खतकारखान्याचा पुरवठा खूप कमी करण्यात आला होता. परंतु ह्या वर्षीचे अपुऱ्या वीजनिर्मितीचे संकट गेल्या वर्षापेक्षाही अधिक उग्र आहे. त्यामुळे नांगलचा खतकारखाना संपूर्णपणे बंदही करावा लागेल.

---

## डॉलर्सची अप्रतिष्ठा : वर्चस्वाचे दिवस संपत आले

दुसरे महायुद्ध संपले, त्या वेळी अमेरिका हेच सर्व जगातील प्रबळ राष्ट्र होते —आर्थिक आणि लष्करी, दोन्ही दृष्टींनी. जगातील एकूण सोन्यापैकी ५६% सोने अमेरिकेतील फोर्ट नॉक्समध्ये ठेवलेले होते. सध्याची आंतरराष्ट्रीय चलनव्यवस्था १९४४ च्या ब्रेटनवुड परिषदेत ठरविण्यात आली, तेव्हा तिला सोन्यामध्ये व्यक्त होणाऱ्या किमतीचा आधार दिला होता. परंतु डॉलरचा प्रभाव एवढा मोठा होता की, इतर देशांच्या चलनांची किंमत सोन्याऐवजी डॉलरमध्ये सांगण्यात येऊ लागली. डॉलर म्हणजे जणू सोनेच, अशीच सबंध जगाची कल्पना होती. परंतु गेली कित्येक वर्षे अमेरिका बाहेरील जगात स्वतःला परवडेल त्यापेक्षा अधिक प्रमाणात डॉलर्स उधळीत आहे, गुंतवीत आहे, लष्करावर खर्च करीत आहे. प. जर्मनी आणि जपान हे देश अमेरिकेला मागे ढकलू लागले आहेत. त्यामुळे युरोपातील देश आणि व्यापारी ह्यांचेकडील डॉलरची प्रतिष्ठा कमी झाली आहे. अमेरिकन डॉलर इतर देशांतून मागणीपेक्षा अधिक प्रमाणात खर्च होऊ लागले, गुंतविण्यात येऊ लागले, म्हणजे साहजिकच डॉलरमध्ये व्यक्त होणारी इतर चलनांची किंमत वाढू लागते. अमेरिकन प्रवासी इतर देशांच्या चलनाबद्दल उद्धटपणे विचारतात "त्या चलनाची खरी किंमत किती आहे?" तोच प्रश्न डॉलरबद्दल विचारला जाऊ लागला आणि डॉलरची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत अप्रतिष्ठा झाली. डॉलरचे वर्चस्व संपत आले आहे, त्याची प्रचिती गेल्या पंधरवड्यातील घटनांनी आणून दिली आहे.

---

## ऑडिटरांना जादा मोबदला

ऑडिटरांना कंपनीच्या वार्षिक सभा फी मंजूर करतात, तिच्या व्यतिरिक्त बरीच मोठी रक्कम डायरेक्टर बोर्ड त्यांना इतर कामासाठी देते, ह्यावर प्रो. के. टी. मर्चंट ह्यांनी कडक टीका केली आहे. स्टँडर्ड मिल्सच्या ऑडिटरांची ऑडिट फी २०,००० रु. ठरली होती. त्यांना इतर कामासाठी डायरेक्टर बोर्डाने ५२,५२६रु. दिले. असे पैसे देण्यामुळे ऑडिटरांच्या त्रयस्थ, स्वतंत्र मतावर प्रतिकूल परिणाम होण्याचा संभव असतो.

---

## पाकिस्तानची आर्थिक नाडी मंदावल्याची कबुली

पाकिस्तानच्या लष्करी राजवटीने पूर्व बंगालमधील लोकशाही-विरुद्ध घोर उपाय योजण्यास प्रारंभ केल्याला आता महिन्यापेक्षा अधिक काळ लोटला आहे. ह्या अवधीत पाकिस्तानच्या अर्थ-व्यवस्थेवर कमालीचा ताण पडल्याच्या वार्ता येत आहेत. आता पाकिस्तान टाइम्स ह्या पत्रानेच पाकिस्तानच्या आर्थिक दुखण्याची कबुली दिली आहे. हे पत्र सरकारच्या नियंत्रणाखालील आहे हे लक्षात घेतले पाहिजे. पूर्व बंगालमधील यादवी सुरू झाल्यापासून पाकिस्तानच्या आर्थिक अडचणी अधिक खोलवर व दूरवर पसरत चालल्या असल्याचे सांगून ह्या पत्राने भविष्यकालाचे भेसूर चित्र रंगविले आहे. पण ह्या परिस्थितीचे खापर बड्या राष्ट्रांच्या माथी फोडण्याची दक्षता अर्थातच घेण्यात आली आहे. पत्र आपल्या अग्रलेखात म्हणते की पाकिस्तानचे सरकार सध्या देशाचे प्रादेशिक अभंगत्व राखण्यात गुंतलेले आहे. पण ह्या गोष्टीची दखल बडे देश घेत नाहीत. त्यामुळे पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेच्या विकासाचा वेग मंदावणे साहजिक आहे. १९७०–७१ च्या कार्यक्रमांत हा वेग ६·२ टक्के होईल अशी अपेक्षा होती. पण तो आता ४ टक्के किंवा त्याहीपेक्षा कमी होण्याचा संभव आहे. शेतीचे उत्पादन घसरण्याची चिन्हे दिसत आहेत आणि उद्योग-धंद्यांनाही अनेक प्रकारच्या अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. पाकिस्तानच्या दोन भागांतील व्यापार थांबल्याने वस्तूंचे साठे पडून आहेत. त्यामुळे केवळ समुद्रमार्गाने होणाऱ्या व्यापारातच २७·४ कोटी रुपयांची ठोकर बसली आहे.

---

## १९७४ च्या सुमारास १ लाख इंजिनिअर बेकार

इन्स्टिटयूट ऑफ अप्लाइड मॅनपॉवर रिसर्च ह्या संस्थेने असा अंदाज केला आहे की १९७४ च्या सुमारास सुमारे १ लाख इंजिनिअर बिनारोजगार असतील. अलीकडे नव्याने उत्तीर्ण झालेल्या इंजिनिअर्सच्या बेकारांच्या संख्येत काहीशी घट झालेली असली तर आजही सुमारे ७० हजार इंजिनिअर्स बेकार आहेत अगर त्यांना योग्य अशी कामे मिळालेली नाहीत. देशातील तंत्रज्ञात माजत चाललेली बेकारी लक्षात घेऊन १९६८–६९ सालापासून इंजिनिअरिंग कॉलेजांतून आणि तांत्रिक शिक्षणाच्या संस्थांतून प्रवेश द्यावयाच्या विद्यार्थ्यांच्या संख्येत ३० टक्के कपात करण्यात आली होती. परंतु तरीही इंजिनिअरिंगची पदवी अगर पदविका मिळवून बाहेर पडणाऱ्यांची संख्या वाढली आणि मागणीपेक्षा त्याचा अधिक पुरवठा होऊ लागला. दरसाल शिकून बाहेर पडणाऱ्या ह्या तंत्रज्ञांची संख्या सध्याइतकीच चालू राहिली तर चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या अवधीत ९२ हजार नवे इंजिनिअर्स आणि १ लाखावर डिप्लोमावाले नव्याने रोजगार बाजारात येतील. १९७३ अखेर शिक्षित इंजिनिअरांची संख्या सध्याच्या ३ लाख, ४० हजारांवरून ४ लाख, ८५ हजारांपर्यंत वाढेल असा अंदाज आहे. १९७८ च्या सुमारास तर ही संख्या ५ लाख, ८४ हजारापर्यंत येईल. चौथ्या पंचवार्षिक योजनेत गृहीत धरण्यात आलेला आर्थिक वाढीचा वेग लक्षात घेऊन १९७४ च्या सुमारास इंजिनिअरिंग शिकलेले १ लाख लोक बेकार राहतील. १९७९ च्या आसपास मागणी व पुरवठ्यात समतोल येईल.

---

## काळ्या पैशाबद्दलच्या अहवालाला विलंब

१९७० च्या मार्च महिन्यात प्रत्यक्ष कराविषयी अहवाल तयार करण्यासाठी न्यायमूर्ती वांच्छु ह्यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमण्यात आली होती. ही कमिटी आपला अहवाल १९७०-७१ चे अंदाजपत्रक लोकसभेत मांडण्यापूर्वी सादर करील अशी अपेक्षा होती. देशात विखुरलेल्या बिनहिशेबी अगर काळ्या पैशाविषयी चौकशी करून तो उजेडात आणण्यासाठी शिफारसी करण्याचे काम कमिटी करणार होती. त्याचप्रमाणे काळा पैसा नव्याने उत्पन्न होऊ न देण्यासाठी व कायदेशीर मार्गाने कर चुकविता येण्यासारख्या पळवाटाही बुजविण्यासाठी कमिटीने सूचना करावयाच्या होत्या. परंतु ह्या कामाची सध्याची अवस्था पाहता संकल्पित अहवाल चालू वर्षाच्या डिसेंबर महिन्यापर्यंत तरी तयार होऊ शकणार नाही असे दिसते. त्यामुळे बिनहिशेबी पैशाला सरकारच्या तिजोरीत अडकाविण्याचा सरकारचा इरादा ताबडतोब सफल होण्याची शक्यता लांबली आहे. कमिटीचा तात्पुरता अहवाल हाती येता तर त्यातील काही सूचनांचा अंदाजपत्रकात समावेश करण्याचा सरकारचा हेतू होता. कमिटीचे पुरावा दाखल करून घेण्याचे काम जूनपर्यंत चालणार असा रंग दिसतो. ह्या पुराव्याची छाननी करून अहवाल तयार करणे घाईने जमण्यासारखे नाही. सुमारे १० वर्षांपूर्वी प्रा. काल्डोर ह्यांनी भारतात सुमारे ४०० कोटी रुपयांचा काळा पैसा फिरत असावा असा अंदाज केला होता. लोकसभेत व बाहेर अशा काळ्या पैशासंबंधी अनेकदा तक्रारी करण्यात आल्या होत्या. मात्र काळ्या पैशासंबंधीचा आकडा ३,००० कोटीचा सांगण्यात येत असे.

---

## उत्तर प्रदेशातील साखर कारखान्यांचा लिलाव

उत्तर प्रदेशातील सहा साखर कारखान्यांचे लिलाव करण्याचा हुकूम राज्य सरकारने काढला आहे. ह्या कारखान्यांकडून उसाच्या शेतकऱ्यांना व सरकारला मोठी रक्कम येणे आहे. उसाच्या विक्रीचे शेतकऱ्यांचे पैसे आणि सरकारचा खरेदी कर ह्यांची साचलेली रक्कम त्यांना देता येत नाही अशी खात्री झाल्यावरच हुकूम काढण्यात आला आहे. राज्य सरकारने २६ साखर कारखान्यां-विरुद्ध हीच देणी वसूल करण्यासाठी दाखले काढले आहेत. राज्यातील साखर कारखानदारांकडून उसाच्या शेतकऱ्यांना उसाची किंमत म्हणून २२ कोटी रुपये येणे आहेत. त्याशिवाय सरकारच्या खरेदीकराची ७ कोटी रुपयांची रक्कमही त्यांच्याकडे थकली आहे. थकबाकीची वसुली अत्यंत जरूर झाली आहे.

---

स्थापना १९११

माकडछाप

म्हणजेच

काळी टूथपावडर

नोगी आणि कंपनी प्रा. ली.
मुंबई ६१ ओ. अेस.

सोल सेलींग अेजन्टस्

**नोगी सेल्स् कॉर्पोरेशन**

१७० जगन्नाथ शंकरशेठ रोड, मुंबई ४. बी आर.

MARATHI

**THE BELGAUM BANK LIMITED**

**Estd. 1930**

SCHEDULED BANK

*Regd. Office* : **659–60, Raviwar Peth, Belgaum**

**Working Funds : Over Rs. 7 Crores**

**Share Capital &**
**Reserves : Over Rs. 17 Lacs**

40 Branches in the States of Mysore & Maharashtra & Goa Territory – Major Number of Branches in Rural Areas – Facility of Safe Deposit Lokers at Belgaum, Gokak and Nipani Branches in Mysore State.

**S. Y. KAMAT**
*General Manager.*

**K. B. KIRTIKAR**
*Chairman.*




किर्लोस्कर ®

डीज़ल एंजिन
की प्रसिद्धि के कारण
▪ गुणवत्ता ▪ टिकाऊपन
▪ विश्वसनीयता तथा
▪ किसानों की समृद्धि

उत्कृष्ट डीज़ल एंजिन के निर्माता
किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लिमिटेड, पूना-३ (भारत)

" ® Registered User-Kirloskar Oil Engines Ltd., Poona-3"

# गंगेचे पाणी थेट कावेरी-पर्यंतची जमीन भिजविणार ?

## ३,००० मैल लांबीच्या प्रचंड कालव्याचे विशाल स्वप्न

भारत हा जगातील सातव्या क्रमांकाचा मोठा देश आहे. त्याचे क्षेत्रफळ १२·७० लक्ष चौरस मैल असून त्याची पूर्व-पश्चिम लांबी १,८५० मैल आणि दक्षिण-उत्तर लांबी २,००० मैल आहे. हिमालयाचा प्रदेश, सिंधू-गंगा नद्यांची खोरी, दक्षिण द्वीपकल्प आणि थर वाळवंट, असे त्याचे स्थूलमानाने चार भाग पाडता येतात.

भारताचे पावसाचे वार्षिक सरासरी मान ४५ इंच आहे. राजस्थानसारख्या वालुकामय प्रदेशात ५ इंच पाऊस पडतो, तर आसामच्या पर्वत भागात ५०० इंच पाऊस पडतो, इतकी पावसामध्ये तफावत आहे. ह्या पावसाची निश्चिती काहीच नसते; त्यामुळे भारताच्या कित्येक विभागांना मधूनमधून दुष्काळाचा तडाखा सोसावा लागतो. वायव्येकडील राजस्थानचे वाळवंट सोडले, तर भारताच्या सर्व विभागांच्या वाट्याला पुरेशा नद्यांचे जाळे आलेले आहे. ह्या जाळ्यांची अशी वर्गवारी करता येईल : (१) उत्तर भारतातील, बर्फाच्या पाण्यामुळे वर्षभर तुडुंब वाहणाऱ्या नद्या आणि (२) मध्य आणि दक्षिण भारतातील नद्या.

उत्तर भारतातील महत्त्वाच्या नद्या म्हणजे हिमालयात उगम पावणाऱ्या सिंधू, गंगा आणि ब्रह्मपुत्रा ह्या नद्या होत. त्या सर्वांना बर्फाचे पाणी भरपूर, वर्षभर मिळते. अर्थात, हिवाळ्यात पाण्याचे प्रमाण कमी होते. सबंध भारतातील सर्व नद्यांतून मिळून जेवढे पाणी वाहते, त्यांपैकी सुमारे ६०% पाणी हिमालयातून निघणाऱ्या आणि त्यांना येऊन मिळणाऱ्या नद्यांतून वाहते.

मध्य आणि दक्षिण भारतातील प्रमुख नद्यांपैकी महानदी, गोदावरी, कृष्णा आणि कावेरी ह्या पूर्ववाहिनी असून त्या बंगालच्या उपसागराला जाऊन मिळतात. नर्मदा आणि तापी ह्या नद्या पश्चिमवाहिनी आहेत आणि त्या अरबी समुद्राला जाऊन मिळतात. ह्या सर्व नद्या पावसावरच पूर्णपणे अवलंबून असतात आणि ह्या पावसापैकी बहुतेक पाऊस पावसाळ्याच्या चार महिन्यांतच, जून ते सप्टेंबर ह्या अवधीत, पडतो. उन्हाळ्यात ह्या नद्या जवळजवळ कोरड्या होतात.

ह्या सर्वच नद्या मान्सूनमध्ये म्हणजे पावसाळ्याच्या महिन्यांत तुडुंब भरून वाहतात; त्यांतून प्रचंड पाणी समुद्राकडे वाहात जाते. अर्थातच, ते सर्व वाया जाते. मान्सून संपल्यावर त्यांच्या पात्रात एवढे कमी पाणी असते, की ते शेतीच्या उपयोगी पडू शकत नाही. ही अडचण लक्षात घेऊन, त्यांच्यावर धरणे बांधून त्यांत पाणी साठविणे आणि त्या धरणांचा एकमेकांशी संबंध जोडून वेगवेगळ्या नद्यांच्या विभागांतील पाण्याचा तुटवडा भरून काढणे, ही नद्यांच्या पाणीपुरवठ्याच्या योजनांची गुरुकिल्ली आहे.

उत्तरेकडील नद्यांना जेव्हा पूर येतात, तेव्हा त्यांचे जादा पाणी साठविता आले किंवा मध्य आणि दक्षिण भारतातील नद्यांकडे वळवून त्यात सोडता आले, तर मान्सूनच्या पावसाच्या मर्जीवरील आपले अवलंबन खूपच कमी होईल आणि शेतीला खात्रीलायक पाणीपुरवठा करता येईल. काही प्रदेशांत पाऊस कमी झाला किंवा शेवटचे एक-दोन पाऊस न पडल्यामुळे पिके करपू लागली, तर अशा 'ग्रँड फीडर कॅनाल' किंवा त्याच्या शाखांद्वारा वेळेवारी पाणी देता येईल.

फार प्राचीन काळापासून आपण आपल्या नद्यांना पवित्र मानीत आलो आहो, आणि त्या नद्यांची ऐक्यभावना जोपासत आहो. स्नानाच्या वेळी आपण प्रार्थना करतो, "गंगे च यमुने चैव गोदावरि सरस्वति । नर्मदे, सिंधु, कावेरि, जलेऽस्मिन् संनिधिं कुरू" (ह्या इथल्या पाण्यात गंगा, यमुना, गोदावरी, सरस्वती, नर्मदा, सिंधु आणि कावेरी ह्या नद्यांचे पाणी मिसळून जावो.)

सरस्वती नदी अदृश्य होऊन एका नदीतून दुसऱ्या नदीत जाते, अशीही आपली भावना आहे. ती पवित्र गंगा आणि दक्षिण गंगा म्हणजे गोदावरी ह्यांना जोडते. अशा प्रकारे सर्व नद्या एकमेकांशी जोडल्या जाऊन सबंध देशाच्या त्या बनतात, अशी आपली पुरातन काळापासूनची परंपरा आहे.

अंतर्गत वाहतुकीसाठी नद्या एकमेकींना जोडणे शक्य होईल, असे सर आर्थर कॉटन ह्यांचे स्वप्न होते. त्यातूनच आंध्र प्रदेशातील काकिनाडा आणि तामीळनाडूमधील मद्रास ह्यांना जोडणारा बकिंगहॅम कालवा बांधण्यात आला. त्यामुळे ३८५ मैल जलवाहतूक शक्य झाली. सुप्रसिद्ध तामीळ कवी सुब्रम्हण्यम् भारती, एक भूतपूर्व काँग्रेस-अध्यक्ष श्री. एस. श्रीनिवास अयंगार आणि डॉ. सी. पी. रामस्वामी अय्यर ह्यांनी त्याहीपुढे जाऊन गंगेचे पाणी दक्षिणेत आणण्याची स्वप्ने रंगविली.

नद्या एकमेकांशी जोडण्याच्या कल्पनेस असा ऐतिहासिक आधार आहे. आता, त्याच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या योजनेचा विचार करावयाचा आहे. त्यासाठी कराव्या लागणाऱ्या पाहण्या, नकाशे, खर्चाचे अंदाज, इत्यादींसाठीच कितीतरी वर्षे लागतील. ह्याचा अर्थ, चालू पिढीने आगामी पिढ्यांसाठी हे सर्व कष्ट करावयाचे आहेत.

गंगेच्या मान्सूनमधील, पाटण्याजवळील सरासरी प्रवाहाचा अंदाज सुमारे १८ कोटी एकर-फूट आहे. वरच्या बाजूस गंगेवर आणि तिच्या उपनद्यांवर धरणांची आणि सर्वांची गरज भागेल एवढ्या पाण्याच्या प्रवाहाची तरतूद केली, तरी मान्सूनच्या चार महिन्यांत बरेच पाणी जरूरीपेक्षा जास्त असेल आणि ते कावेरी-पर्यंतच नव्हे तर आणखी दक्षिणेकडे वळविता येईल. वाटेत राजस्थान आणि म्हैसूरचा उंचवट्याचा प्रदेश ह्यांच्यासाठी कालवे काढता येतील. अर्थात, ह्याचा तपशीलवार अभ्यास करावयास हवा; त्यासाठी मोजणी, आखणी ह्यासच कितीतरी

वर्षे लागतील. प्रत्यक्ष पाणी मिळू लागण्यास २१ वे शतक उजाडेल! तोवर, भारतावर ८० कोटींपेक्षा जास्त लोकांची पोटे भरण्याची जबाबदारी आलेली असेल.

गंगा नदीत जरूरीपेक्षा जास्त पाणी असते, अशा काळात सुमारे १ ते २ कोटी एकर-फूट पाणी अशा रीतीने दक्षिणेकडे नेता येईल. अर्थात, प्रत्यक्ष पाहणी केल्याखेरीज पक्का अंदाज करता येणार नाही. पाटण्याची उंची समुद्रसपाटीपासून १५० फूट आहे, तेथून ते मोरहार नदीवर धरणावर धरणे बांधून १,००० फूट उंचीवर पंप करून न्यावे लागेल. तेथून ते २,००० फूट उंचीच्या डोंगरमाथ्यावर पंपाने चढवावे लागेल. हा कालवा नंतर रिहंड आणि महानदी ह्यांना विभागणाऱ्या पर्वतरांगेवरून जाऊन, महानदीच्या वरच्या खोऱ्यांतून वाहील आणि नंतर महानदी आणि नर्मदा खोऱ्यांना विभागणाऱ्या पर्वत रांगेवरून पुढे जाईल. नर्मदेचे खोरे ओलांडून तो कालवा नर्मदा आणि वैणगंगा नद्यांना विभागणाऱ्या पर्वतरांगेवरून जाईल. ह्या नद्यांच्या खोऱ्यांना विभागणाऱ्या डोंगरातून नंतर वैणगंगा खोरे ओलांडून वैणगंगा-तापीची फारकत करणाऱ्या डोंगरमाथ्यावर येईल. त्यानंतर तो कालवा गोदावरीवरील पोचमपाद धरणाच्या वरच्या बाजूस त्या नदीत दाखल होईल. येथे त्याची समुद्रसपाटीपासूनची उंची १,०९१ फूट असेल. पोचमपाद धरणातून पाणी कृष्णा नदीवरील श्रीशैलम धरणात येईल; त्यासाठी त्याला ४३० मैल लांबीच्या कालव्यातून जावे लागेल आणि समुद्रसपाटीपासून ८८५ फूट उंचीवर यावे लागेल. तेथे पाणी पंप करून ३०० फूट चढविले जाईल आणि ७५० मैल लांबीच्या कालव्यातून कावेरी नदीवरील समुद्रसपाटीपासून ७९६ फूट उंचीच्या मेतूर धरणात ते पोचविले जाईल. तेथून ते पाणी अगदी दक्षिणेकडील ताम्रपर्णी नदीत सोडता येईल.

महाराष्ट्र, राजस्थान आणि म्हैसूर व तामिळनाडूमधील उंचीवरचे प्रदेश, ह्यांच्यासाठी गँड फीडर कॅनॉलच्या शाखा काढता येतील. अशा रीतीने, ज्याज्या ठिकाणी पावसाने दगा दिला असेल किंवा पाऊसच कमी पडत असेल, अशा ठिकाणी कालवा पाणी पुरवू शकेल. स्थानिक पाणीपुरवठ्यातील उणीवा भरून काढणे, हा प्रस्तुत कालव्याचा हेतू आहे.'

भारतातील प्रमुख नद्यांचा संयोग घडवून आणणाऱ्या प्रचंड कालव्याची ही ढोबळ रूपरेषा आहे. असा कालवा प्रत्यक्ष कसा घडविता येईल, हे तांत्रिक दृष्ट्या ठरवावे लागेल. त्यासाठी विमानातून पहाणी करावी लागेल. जमीनीचा उंचसखलपणा मोजावा लागेल, जमीनीची तपासणी करावी लागेल, धरणांच्या पायांच्या दृष्टीने भूगर्भाची पाहणी करावी लागेल, अशा अनेक गोष्टी कराव्या लागतील. विजेच्या साह्याने ठिकठिकाणी पाणी उंच खेचण्याच्या योजना तयार कराव्या लागतील, त्याकरिता पंपिंग स्टेशन्स आणि विद्युतगृहे उभारावी लागतील. नळ कुठे आणि कसे घालावयाचे, तारा कशा न्यावयाच्या, हे सर्व ठरवावे लागेल.

ह्या प्रचंड योजनेला बराच कालावधी लागेल, त्याचप्रमाणे खर्चही खूपच येईल. हा खर्च करण्याची ताकद भारताला आधी प्राप्त झाली पाहिजे. ते होईपर्यंत लोकसंख्येत भयंकर भर पडलेली असावयाची, आणि मध्य व दक्षिण भारतामधील अधिकाधिक जमीन शेतीखाली आणण्याची गरज अधिकच तीव्र झालेली असावयाची; तथापि, पूर्वतयारीस आताच प्रारंभ करावयाला हरकत नाही.

नद्या एकमेकांना जोडून त्यातून वाहतूक शक्य करण्याचा इंग्रजांचा मूळ हेतू भारतामधील कच्चा माल निर्गत होण्यासाठी तो कमीतकमी खर्चात उपलब्ध व्हावा, हाच होता. परंतु, ब्रिटिश राजवटीने रेल्वे आणि रस्ते हे वाहतुकीचे मार्ग वाढविण्यावर भर दिल्यामुळे, सर ऑर्थर कॉटन ह्यांची मूळ योजना मागे पडली. ती आता शेतीला पाणीपुरवठ्यासाठी नव्या स्वरूपात अमलात आणण्यास हरकत नाही. ही योजना आज स्वप्नवत् वाटेल, परंतु सर्वच मोठ्या योजनांचा उगम अशा स्वप्नातूनच होत असतो. तांत्रिक ज्ञानात पडत चाललेली भर आणि भारताच्या आर्थिक अभिवृद्धीची अपेक्षा जमेस धरली, तर हे स्वप्न साकार होणे शक्य कोटीत आहे. आपण आजच देशातील वीज-पुरवठ्याच्या बाबतीत असलेली विसंगती 'ऑल इंडिया पॉवर ग्रिड' च्याद्वारा दूर करू लागलो आहोत. कालांतराने देशाच्या सर्व भागांत वीज खेळू लागून देशाची औद्योगिक आणि शेतीची प्रगती झपाट्याने होऊ लागेल, अशी आशा वाटू लागली आहे. तीच गोष्ट पाणीपुरवठ्यालाही लागू आहे.




ठाकरसी कापडाने फॅशनची रंगत वाढते !
पुढचं पाऊल काय टाकावं हे कळेनासं होतं तेव्हा—प्रथम ठाकरसी कापड वापरा. मग कोणत्याहि कामासाठी आवश्यक सळसळतं चैतन्य, उल्हसित करणारा उत्साह आणि तरतरी वाटू लागेल! फॅशनच्या क्षेत्रांत आघाडीवर राहण्यासाठीं खुशाल पाऊल टाका नि ठाकरसीचं कापड घ्या. एव्हरफ्रेश (६७% 'टेरीन' ३३% कॉटन) साड्या, फ्रॉकचे कापड, शर्टिंग्ज आणि सूटिंग्ज, स्क्रीन प्रिंट्स, २×२ पॉप्लिन, रंगीत/प्रिंटेड् कॅम्ब्रिक्स, वॉयल्स, डॉबीज्, जेकार्डस्, आणि अनेक प्रकारचे कापड.
Madison/HSW/4 Mar
दि हिंदुस्थान स्पिनिंग अॅण्ड वीव्हिंग मिल्स लि., १६, अपोलो स्ट्रीट, मुंबई-१

# आमच्या २ योजना आपले स्वप्न साकार करतील

**निश्चित काल ठेव योजना**

ह्या योजनेत तुम्ही जितके पैसे दरमहा ठेवाल त्याच्या दुप्पट तुम्हाला परत मिळतील. मुलांचे शिक्षण, विमा हप्ता, सेवानिवृत्तीनंतर नियमित मिळकत इ. साठी या योजनेचा फायदा घ्या.

आपण दरमहा रु. १० अगर त्याच्या पटीत पैसे ठेवू शकता. १० रु. १२० महिने भरल्यास आपणास २४०० रु. परत मिळतील.

**संचित ठेव योजना**

या योजनेत तुम्हाला तुमच्या संचित ठेवीवर व्याज देण्याऐवजीं त्याचा दरमहा हिशोब केल्याने तुमच्या बचतीत अधिक भर पडते, आणि या रकमेवर तुम्हाला व्याज मिळते.

मुदतीनंतर ठेवीबरोबरच व्याजावर व्याजही मिळते, सध्याच्या ठेवींपेक्षा ही योजना कितीतरी लाभदायक आहे.

१००० रुपये १८ महिने ठेवल्यास ११०० रुपये मिळतील; ६९ महिने ठेवल्यास १५०० रु. मिळतील.

**सविस्तर माहिती नजिकच्या महाराष्ट्र बँकेच्या कोणत्याही शाखेत मिळेल.**

## बँक ऑफ महाराष्ट्र

हेड ऑफिस : ११७७ बुधवार पेठ, पुणे २.

Pratibha 712D


हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)